निगराणी

# आंबा पिकावरील फळमाशीचा बंदोबस्त

**डॉ. राजकुमार बनकर**
(मो.नं. ९४०४६४८५५)
भारतीय मृदा तथा भू उपयोग
सर्वेक्षण संस्था, कोलकाता, भारत
**डॉ. प्रवीण राऊत**
**विक्रम कापसे**



उत्पादनाच्या आणि गुणवत्तेच्या दृष्टीने आंबा या महत्त्वाच्या पिकाची काळजी घेणे गरजेचे आहे. आंब्यावर जवळपास १२५ जातींच्या किडींची नोंद झालेली आहे. त्यापैकी फळमाशी ही एक अत्यंत महत्त्वाची कीड असून, ती चांगल्या फळाचे नुकसान करून त्याची प्रत, बाजारातील किंमत तसेच उत्पादन घटविण्यास कारणीभूत ठरते. आंबा निर्यातीत होणारी वाढ आणि त्याद्वारे मिळणाऱ्या परकीय चलनाची गरज लक्षात घेता अशा किडीचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

**जा**गतिक पातळीवरील महत्त्वाचे फळपीक म्हणून आंबा गणला जाऊ लागला आहे. भारतामधील फळझाडांखालील एकूण क्षेत्राचा विचार करता सर्वात जास्त क्षेत्र हे आंबा या पिकाखाली येते. जगाच्या ५६ टक्के आंबा उत्पादन भारतात होते. महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांत आंब्याची लागवड होते; परंतु कोकण विभागात सर्वात जास्त क्षेत्र आंब्याखाली असून त्यानंतर पश्चिम महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. आंबा फळातील विविध गुणधर्मांमुळे म्हणजे पौष्टिक घटक (अ, ब व क जीवनसत्त्वे), मधुर चव, उपयुक्तता आणि निर्यातीतून मिळणारे परकीय चलन इ. गुणांमुळे आंब्याला 'फळाचा राजा' असे म्हणतात.

उत्पादनाच्या आणि गुणवत्तेच्या दृष्टीने आंबा या महत्त्वाच्या पिकाची काळजी घेणे गरजेचे आहे. आंब्यावर जवळपास १२५ जातींच्या किडींची नोंद झालेली आहे. त्यापैकी फळमाशी ही एक अत्यंत महत्त्वाची कीड असून, ती चांगल्या फळाचे नुकसान करून त्याची प्रत, बाजारातील किंमत तसेच उत्पादन घटविण्यास कारणीभूत ठरते. आंबा निर्यातीत होणारी वाढ आणि त्याद्वारे मिळणाऱ्या परकीय चलनाची गरज लक्षात घेता अशा किडीचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.



**फळमाशीचा जीवनक्रम** : फळमाशी ही कीड मार्च ते मे महिन्यात जास्त सक्रिय होते. तसेच थंडीच्या महिन्यात ही कीड सुस्त असते. या किडीच्या वाढीसाठी साधारणत: २१ अंश ते ४० अंश से. तापमान आवश्यक असते. प्रजननासाठी २१ अंश से. पेक्षा जास्त तापमानाची गरज असते. या किडीची मादी फळामध्येच आतील भागात फळावरील सालीत बारीक छिद्र करून १५० ते २०० अंडी गुच्छाच्या स्वरुपात ८ ते १५ ठिकाणी देते. साधारणत: ३ ते ४ दिवसांनी या अंड्यामधून लहान अळ्या बाहेर येऊन त्या लगेच फळाचा आतील गर खाण्यास सुरूवात करतात व पुढे तोच गर सडायला लागतो. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या ८ ते १० दिवसानंतर खाली पडलेल्या फळांमधून बाहेर येऊन त्यांचे कोषात रूपांतर होण्यासाठी जमिनीत जातात. पावसानंतर किंवा जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास पूर्ण वाढ झालेल्या प्रौढ फळमाश्या कोषातून बाहेर पडतात.

**नुकसानीचे स्वरुप** : फळमाशीची मादी कोषातून बाहेर पडल्यानंतर अर्धवट पिकलेल्या आंब्याच्या फळाकडे आकर्षित होते. नंतर तेथेच फळाच्या आतील भागात फळावरील सालीस बारीक छिद्र करून अंडी घालते. अंड्यातून बाहेर आलेल्या लहान अळ्या फळाचा आतील गर खाण्यास सुरूवात करतात व विष्ठा तेथेच टाकल्यामुळे तो गर सडण्यास सुरूवात होते. अशा फळावर बाहेरील जीवजंतू बसल्यामुळे फळाची प्रत बिघडते. यामुळे अशा फळांना बाजारात योग्य किंमत मिळत नाही व अशी अर्धवट पिकलेली फळे खाली पडतात. त्याचा परिणाम उत्पादन घटण्यावर होतो. खाली पडलेल्या फळांतून पूर्ण वाढ झालेली अळी बाहेर जमिनीतच ३ ते ४ सें.मी. खोलीवर जाऊन कोषाच्या स्वरुपात सुप्तावस्थेत राहते. परंतु ७ ते १० दिवसांनी नर जमिनीबाहेर येतो व सक्रिय होतो.

**व्यवस्थापन** : १. दररोज खराब झालेली व खाली पडलेली फळे उचलून बागेत स्वच्छता ठेवावी.

२. बागेची खोल नांगरणी करावी, कारण किडीचे कोष जमिनीत वास्तव्य करतात. जमीन नांगरल्यामुळे ते वर येऊन इतर पक्ष्यांचे भक्ष्य बनतील.

३. अनुकूल वातावरणात (फेब्रुवारी ते मे महिन्यात) जमिनीतून बाहेर आलेली नरमाशी साधारणत: अर्धा तास तशीच जमिनीवर पडून राहते. त्यावेळेस आंब्याच्या झाडाजवळ जमिनीवर मिथिल पॅरॉथिऑन या कीटकनाशकाची फवारणी करावी.

४. बागेतील बांधावर काळी तुळस लावावी. कारण तिच्या फुलात मिथिल युजिनॉलचे प्रमाण असते ते नर फळमाशीला आकर्षित करते.

५. फळमाशीच्या प्रभावी नियंत्रणासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी मिथिल युजिनॉलचा वापर करून तयार केलेले रक्षक सापळे हेक्टरी ४ या प्रमाणात लावावेत.

६. फुलधारणेनंतर ४५ दिवसांनी १५ दिवसांच्या अंतराने फेन्थिऑन ५० इ.सी. किंवा फेन्वलेंट २० इसी किंवा डेलटामेथ्रीन २.८ इसी किंवा सायपरमेथ्रिन २५ इ.सी. इत्यादी कीटकनाशकांची फवारणी करावी.

७. मादी फळमाशीसाठी पुढीलप्रमाणे विषारी द्रावण तयार करावे – फेनिट्रोथिऑन किंवा मेलॅथिऑन १० मि.लि. + गूळ ४०० ग्रॅम + पाणी १० लि. यांची मोठ्या थेंबाच्या स्वरुपात १५ दिवसांच्या अंतराने गवतावर फवारणी करावी. फवारणी शक्यतो सायंकाळच्या वेळेस करावी. कारण नर व मादी या वेळेस प्रजननासाठी उद्दिपित होतात. संध्याकाळी व रात्रीच्या वेळी मादी माश्या गवतावर विश्रांती घेतात, म्हणून गवतावर फवारणी करावी. ■